वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार
ता.वसई, जि.पालघर

जा.क्र.वविशम/भांडार/२८८/२०२१
दिनांक :२५/०८/२०२१

## जाहिर दरपत्रक

याद्वारे पुरवठादार,संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे गणेश विसर्जन २०२१ करिता लाकडी तराफे पुरविण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडून दि.०२/०९/२०२१ रोजी दु.३.०० वाजेपर्यत बंद पाकिटातून दरपत्रके मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्रं | तपशिल | आवश्यक नग |
|---|---|---|
| १ | १८ एम.एम.वॉटर प्रुफ प्लायवुड व ४० X ८० एम.एम. सागाच्या पट्टया वापरून १ कोट प्रायमर व ऑईल पेंटचे २ कोट वापरून तराफ्यास चारही बाजूने कडया वापरुन गणेश विसर्जनाकरिता लाकडी तराफे पुरविणे. | |
| | साईज ६" X १०" फूट | १४ नग |
| | साईज ८" X ८" फूट | ०४ नग |

## अटी-शर्ती

१) पुरवठादाराने स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तू व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधनकारक राहिल.
२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३) दरपत्रक मुदतीतमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
४) दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
५) दरपत्रकात नमुद वस्तुंचे/साहित्यांचे दर हे सादर करताना वाहतुकीसह मुळ किंमत व वस्तू व सेवाकर (GST) वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.
६) कार्यादेश दिल्यानंतर ७ दिवसांत तराफे पुरविणे काम करणे बंधनकारक राहील.
७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उपायुक्त (भांडार) यांना राहिल.
८) वरिल अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
९) यासंबंधी दरपत्रके स्वतःचे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक ०२/०९/२०२१ रोजी दु.३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.
१०) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०२/०९/२०२१ रोजी संध्या.३.३० वाजता मा.उप-आयुक्त (भांडार) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी हयांचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ :- मुख्य कार्यालय,विरार
दिनांक :- २५/०८/२०२१

उप आयुक्त(भांडार)
वसई-विरार शहर महानगरपालिका